दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४०४ वा ● शनिवार, ता. १३ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००


## महाराष्ट्र-आयोवा: पहिल्या भगिनी-राज्य करारावर स्वाक्षरी




**मुंबई । रयत समाचार**

महाराष्ट्राने अमेरिकेतील आयोवा राज्याशी पहिल्यांदाच भगिनी-राज्य भागीदारी केली असून या करारामुळे दोन्ही राज्यांदरम्यान विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याची नवी दारे उघडली जाणार आहेत.

मुंबईत आयोवा राज्याच्या राज्यपाल किम रेनॉल्ड्स यांच्या उपस्थितीत झालेल्या या ऐतिहासिक करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या भगिनी-राज्य कराराअंतर्गत शेती, प्रगत उत्पादनक्षेत्र, तंत्रज्ञान, नवीकरणीय ऊर्जा, आरोग्यसेवा व कौशल्य विकास या क्षेत्रांत परस्पर सहकार्य होणार आहे. आयोवा राज्याची कृषी व उत्पादन क्षेत्रातील विशेषता महाराष्ट्रातील शेतकरी व उद्योगांना नवे व्यापार व नवोपक्रमाच्या संधी उपलब्ध करून देईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. ''हा करार महाराष्ट्र व आयोवा राज्यांमधील आर्थिक-सामाजिक विकासाचा नवा अध्याय ठरेल. शेतकरी, उद्योग व नागरिकांना याचा थेट लाभ होईल,'' असे प्रतिपादन फडणवीस यांनी केले.

गव्हर्नर किम रेनॉल्ड्स यांनी मुंबई व महाराष्ट्रातील लोकांच्या आत्मीय स्वागताबद्दल आभार मानले असून आपल्या राज्य व महाराष्ट्र यांच्यातील सहकार्य भविष्यात दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या ऐतिहासिक करारामुळे महाराष्ट्र व आयोवा या दोन राज्यांमध्ये व्यापार, गुंतवणूक व तंत्रज्ञान हस्तांतरणाची नवी दिशा मिळणार आहे.

## सी. पी. राधाकृष्णन यांचा भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी



**नवी दिल्ली । रयत समाचार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना आज राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची शपथ दिली. या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, अनेक केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानसभाचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उपराष्ट्रपतीपदासाठी झालेल्या निवडणुकीत सीपी राधाकृष्णन यांनी प्रतिस्पर्धी इंडिया आघाडीचे उमेदवार बी सुदर्शन रेड्डी यांचा १५२ मतांनी पराभव केला. उपराष्ट्रपतींनी आज राज्यसभेच्या अध्यक्षपदाचा कार्यभारही स्वीकारला.

उपराष्ट्रपती म्हणून सी. पी. राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.




## अहमदनगर रेल्वेस्टेशन आता अहिल्यानगर

**अहमदनगर । रयत समाचार**

अखेर अहमदनगर रेल्वेस्थानकाचेही नामांतर करून ते अहिल्यानगर केले गेले असून, राज्य सरकारने याबाबतची अधिसूचना जारी केली आहे. यामुळे आता शहर, तालुका, जिल्ह्याबरोबर रेल्वेस्थानकाचेही नाव बदलले गेले आहे. राज्य सरकारने रेल्वे स्थानकाच्या नामांतरासाठी केंद्र सरकारच्या गृहमंत्रालयाकडे प्रस्ताव पाठवला होता. केंद्रीय गृहमंत्रालयाने २ सप्टेंबर २०२५ रोजी मंजुरी दिल्यानंतर राज्य सरकारने ११ सप्टेंबरच्या राजपत्रात अधिसूचना प्रकाशित केली. आता देशभरात या स्थानकाचा उल्लेख अहिल्यानगर म्हणून केला जाईल. गेल्या वर्षी शहर, तालुका आणि जिल्ह्याचे नाव आधीच अहिल्यानगर करण्यात आले होते. मात्र, रेल्वेस्थानकाची प्रक्रिया केंद्र सरकारच्या अधिकारात येत असल्यामुळे उरली होती. अखेर ती पूर्ण होताच या ऐतिहासिक बदलामुळे नागरिकांना एकसंध ओळख मिळाली आहे.



## हत्राळ ग्रामस्थ धान्यापासून वंचित; वाढीव इष्टांकाची मागणी

**पाथर्डी । नितीन गटाणी**

हत्राळ गावातील अनेक कुटुंबांना वाढीव इष्टांक न मिळाल्यामुळे ते गेल्या काही वर्षांपासून स्वस्त धान्यापासून वंचित आहेत. वाढीव इष्टांक तात्काळ मंजूर न झाल्यास तहसील कार्यालयासमोर अचानक उपोषण छेडण्याचा इशारा उपसरपंच परमेश्वर टकले यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. तहसीलदार उद्धव नाईक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हत्राळ गावाला गेल्या ७ ते ८ वर्षांपासून नवीन वाढीव इष्टांक मिळालेला नाही. त्यामुळे जवळपास ६० ते ८० रेशनकार्ड धारकांना धान्य मिळत नाही. या कालावधीत गावातील अनेक नवीन नावे रेशन यादीत समाविष्ट झाली असून, काही कार्ड विभक्त झाली आहेत. तसेच लहान मुलांची नावे देखील समाविष्ट झाल्याने वंचितांची संख्या वाढत आहे. यामुळे ग्रामस्थांना शासनाकडून मिळणाऱ्या धान्याबरोबरच आरोग्यसुविधांपासूनही वंचित राहावे लागत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, धान्यदुकानदाराने मयत झालेल्या व्यक्तींची नावे अद्याप कमी केलेली नाहीत. त्याबाबत ग्रामपंचायतीने ठराव करून नावे तहसील कार्यालयाकडे पाठवली आहेत. तरीही कारवाई न झाल्याने गैरसोय होत आहे. गावासाठी लवकरात लवकर वाढीव इष्टांक मंजूर करावा, अन्यथा ग्रामस्थांसह तहसील कार्यालयासमोर उपोषण करण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. या वेळी माजी उपसरपंच सचिन पटारे, दादा शिवणकर, अशोक मोहिते, सुनील आठरे, सोमनाथ पटारे आदी उपस्थित होते.

## वोट चोरी हा देशासमोरील मुख्य मुद्दा, मोदींचा मणिपूर दौरा आता मोठा नाही- गांधी

**जुनागड । रयत समाचार**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी (१२ सप्टेंबर २०२५) मनिपूरमध्ये सुरू असलेल्या परिस्थितीवर भाष्य करत सांगितले की, मनिपूर अनेक काळापासून संकटग्रस्त आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींचा आता येणारा दौरा ''मोठा मुद्दा नाही''. देशासमोरील मुख्य विषय आज 'वोट चोरी' (मत चोरी) आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. गुजरातमधील केशोद विमानतळावर पत्रकारांशी बोलताना लोकसभेतील विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटले की, सर्वत्र लोक 'वोट चोर' घोषणा करत आहेत. राहुल गांधी जुनागड शहरात पोहोचले, जिथे ते काँग्रेसच्या जिल्हा व शहर युनिट अध्यक्षांना मार्गदर्शन करणार होते



तसेच वरिष्ठ नेत्यांशी संवाद साधणार होते. पत्रकारांनी मनिपूर दौऱ्यावर प्रतिक्रिया विचारल्यावर राहुल गांधी म्हणाले, ''मनिपूर अनेक काळापासून संकटात आहे आणि पंतप्रधानांनी आता तिथे जाण्याचे ठरवले आहे. त्यामुळे ते मोठे काही नाही. देशासमोरील मुख्य विषय म्हणजे वोट चोरी.'' पंतप्रधान मोदी १३ सप्टेंबरला मनिपूर दौऱ्यावर असतील, जिथे ते चुराचंदपूर आणि राज्य राजधानी इम्फालमध्ये अंतर्गत स्थलांतरित लोकांशी संवाद साधतील. हे पंतप्रधानांचे राज्यातील दोन वर्षांपूर्वी घडलेल्या जातीय हिंसाचारानंतर पहिले दौरे ठरणार आहे. राहुल गांधी म्हणाले, ''हरियाणा व महाराष्ट्राच्या निवडणुका त्यांनी चोरी केल्या. कर्नाटकात आम्ही हे सिद्ध केले आहे. त्यामुळे देशातील मुख्य विषय वोट चोरी आहे. सर्वत्र लोक 'वोट चोर' घोषणा करत आहेत.'' यावेळी जूनागडमध्ये काँग्रेसच्या संगठन सृजन अभियान अंतर्गत स्थानिक नेत्यांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले गेले आहे, जे १० ते १९ सप्टेंबरपर्यंत चालणार आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी १० सप्टेंबर रोजी शिबिराचे उद्घाटन केले. काँग्रेस प्रवक्त्या मनीष दोस यांनी सांगितले की, राहुल गांधी जिल्हा व शहर युनिट अध्यक्षांना मार्गदर्शन करतील तसेच वरिष्ठ नेत्यांशी संवाद साधतील. ते जवळपास तीन तास शिबिरात राहतील आणि त्यानंतर दिल्लीकडे रवाना होतील.



## महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' नामफलक खटला; सर्व ४२ आरोपींची निर्दोष मुक्तता

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' नामफलक प्रकरणातील सातपैकी प्रलंबित चार खटल्यांमधील १२५/२०१५ क्रमांकाच्या गुन्ह्यातील सर्व ४२ आरोपींना गुरुवारी न्यायालयाने निर्दोष मुक्त केले. या प्रकरणात एकूण ४२ आरोपी होते. त्यापैकी ७ जणांना वगळण्यात आले असून ३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे सध्या ३२ आरोपींविरुद्ध खटला सुरू आहे. या नामफलकाशी संबंधित एकूण सात खटले दाखल झाले होते, त्यापैकी तीन खटल्यांचा निकाल याआधीच लागला असून उर्वरित चार खटल्यांचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे. गुरुवारी झालेल्या सुनावणीत १२५/२०१५ क्रमांकाच्या खटल्यात साक्षीदारांच्या जबाबांतील विसंगती व सबळ पुरावे नसल्याने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. आरोपींच्या बाजूने ॲड. श्यामसुंदर पत्तार, ॲड. हेमराज बेंचन्नावर आणि ॲड. श्याम पाटील यांनी बाजू मांडली. निकालानंतर माध्यमांशी बोलताना ॲड. श्यामसुंदर पत्तार म्हणाले, ''२७ मे २०१४ रोजी 'महाराष्ट्र राज्य येळ्ळूर' हा नामफलक हटवल्यामुळे ग्रामस्थांच्या संतापाचा उद्रेक झाला होता. त्यावेळी दंगलसदृश परिस्थिती निर्माण झाली. या घटनेला कारणीभूत धरून पोलिसांनी सुमारे २५० ते ३०० ग्रामस्थांवर सात गुन्हे दाखल केले. त्यापैकी १२५/२०१५ क्रमांकाच्या खटल्यात आज ४२ आरोपी निर्दोष सुटले आहेत.'' ते पुढे म्हणाले की, सातपैकी चार खटल्यांत येळ्ळूरवासियांची निर्दोष मुक्तता झाली आहे. उर्वरित तीन खटल्यांमध्येही आरोपी निर्दोष सुटतील, असा विश्वास सर्वांच्या सहकार्याने वाटतो.

## 'एमआरएफ' वादावर पडदा, मुलाखती सुरू

**फोंडा । रयत समाचार**

टायर उत्पादन क्षेत्रातील एमआरएफ लिमिटेड कंपनीने सिंधुदुर्ग, कुडाळ येथील नियोजित मुलाखत केंद्र रद्द करून आज (शुक्रवार) फर्मागुढी, फोंडा येथील आयटीआय कॅम्पसमध्ये मुलाखती घेतल्या आणि वादावर पडदा पडला. ॲप्रेंटिसशिपसाठी आयोजित या मुलाखतीत आयटीआय क्षेत्रातील अनेक युवक सहभागी झाले, ज्यामध्ये गोमंतकीयांचा समावेश होता. सकाळी साडे दहा ते दुपारी एक वाजेपर्यंत या मुलाखती घेतल्या गेल्या. एमआरएफ कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत आयटीआयचे अधिकारीही उपस्थित होते. एमआरएफ आणि आयटीआयदरम्यान असलेल्या करारानुसार वेळोवेळी अशी मुलाखती घेतल्या जातात, असे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. एमआरएफने गोमंतकीय युवकांना संधी देण्यासाठी पुढाकार घेतल्याने आयटीआी प्रशिक्षणार्थींनारोजगाराची चांगली संधी मिळाली आहे. रोजगार संधीमुळे आयटीआीमध्ये शिकण्यासाठी येणाऱ्यांची संख्या वाढण्यास मदत होते, असे आयटीआी फोंडा प्राचार्य अक्षय शिरवईकर यांनी सांगितले.






श्रीमती साधना वर्तक, पालघर | श्रीमती कुसुम राहसे, नंदुरबार | श्री. अविनाश पोईनकर, चंद्रपूर | श्री. वैंभव देशमुख, बुलढाणा | श्रीमती सुचिता खल्लाळ, मराठवाडा | श्रीमती हिना खान, पुणे

## मुंबईत कविवर्य ना. धों. महानोर साहित्य व शेती-पाणी पुरस्कार विजेते घोषित

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

ना. धों. महानोर यांच्या स्मरणार्थ सुरू झालेल्या साहित्य व शेती-पाणी पुरस्कारांचे दुसरे वर्ष यंदा साजरे होत आहे. यंदाच्या विजेत्यांची घोषणा खासदार सुप्रिया सुळे यांनी केली. येत्या २६ सप्टेंबर रोजी मुंबईत, यशवंतराव चव्हाण सेंटरचे अध्यक्ष शरद पवार आणि जैन फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या उपस्थितीत पुरस्कार सोहळा होणार आहे. शेती-पाणी विभागात साधना उमेश वर्तक (पालघर) आणि कुसुम सुनील राहसे (नंदुरबार) यांची निवड झाली आहे. तर साहित्य विभागात अविनाश पोईनकर (चंद्रपूर), वैभव देशमुख (बुलढाणा), सुचिता खल्लाळ (मराठवाडा) आणि हिना कौसर खान (पुणे) यांना सन्मान मिळणार आहे. या पुरस्कारार्थ्यांची निवड अशोक जैन, डॉ. जब्बार पटेल, डॉ. प्रज्ञा दया पवार, डॉ. नितीन रिंढे, शंभू पाटील, अजित भुरे आणि पत्रकार रमेश जाधव यांच्या समितीने केली. राज्यभरातील साहित्य व शेती-पाणी क्षेत्रातील कार्याचा सखोल आढावा घेऊन ही निवड करण्यात आली आहे. पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे. या पुरस्कारांमुळे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांनाही व्यासपीठ मिळत असून साहित्य व समाजकार्य क्षेत्राचे लक्ष वेधले आहे.

## मराठा समाजाचा आयुक्त कार्यालया वरील मोर्चा स्थगित

**पिंपरी । रयत समाचार**

संगीता वानखेडे या महिलेने सोशल मीडियावर मराठा समाजाच्या महिलांची बदनामी केली होती. यामुळे सकल मराठा समाजाच्या वतीने मोठ्या संख्येने मराठा समाज एमआयडीसी पोलीस ठाणे भोसरी या ठिकाणी संगीता वानखेडे यांच्यावर कारवाईच्या मागणीसाठी आला होता. यावेळी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात वानखेडे यांच्यावर पोलिसांनी कलम ३५६ अंतर्गत अदखलपात्र गुन्हा दाखल केला होता. यामुळे मराठा समाजामध्ये प्रचंड मोठ्या नाराजी होती संगीता वानखेडे हिच्यावर दखलपात्र गुन्हा दाखल व्हावा असे मराठा समाजाचे म्हणने होते यामुळे सकल मराठा समाजाच्या वतीने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयावर लाखोंच्या संख्येने महामोर्चा काढण्याचे नियोजन करण्यात आले या महामोर्चा बाबत मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते या निवेदनात संगीता वानखेडेवर दखलपात्र गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करा अन्यथा मराठा समाजाच्या वतीने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयावर लवकरच महामोर्चा काढला जाईल असे म्हटले होते मराठा क्रांती मोर्चाच्या या निवेदनाची दखल घेत पोलीस उपायुक्त डॉ. शिवाजी पवार यांनी तातडीने पाच जणांच्या शिष्टमंडळास भेटीसाठी बोलावले या शिष्टमंडळात सतीश काळे प्रकाश जाधव वैभव जाधव सुनिता शिंदे वृषाली साठे नकुल भोईर यांचा समावेश होता यांच्या सोबत चर्चेत डॉ शिवाजी पवार यांनी सांगितले की पोलीस प्रशासन संगीता वानखेडेवर कडक कारवाई करण्यासाठी माननीय न्यायालयाकडून परवानगी घेतली असून आम्ही पुढील कारवाई सुरू केली असल्याचे सांगितले शिष्टमंडळाने पोलीस प्रशासनाकडे पुढील कारवाई काय करणार यांचे लेखी पत्र मागितले तेंव्हा तातडीने पोलीस प्रशासनाकडून शिष्टमंडळाला लेखी स्वरूपात काय कारवाई करणार हे पत्र देण्यात आले यामुळे पोलीस प्रशासनास कारवाई करण्यासाठी वेळ देण्यासाठी सदरचा महामोर्चा मराठा क्रांती मोर्चा पिंपरी चिंचवडच्या वतीने तात्पुरता स्थगित करत आहोत असे निवेदन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तांना देण्यात आले.

## शिंदेसेनेची खा.संजय राऊतांवर कारवाईची मागणी

**मुंबई । रयत समाचार**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर नेपाळमधील हिंसाचाराचे समर्थन केल्याचा आरोप करत कारवाई करण्याची मागणी शिष्टमंडळाने पोलिस आयुक्तांकडे केली आहे.



शुक्रवारी शिवसेना शिष्टमंडळाने मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती यांची भेट घेऊन संजय राऊत यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम १५० नुसार गुन्हा दाखल करण्याचे लेखी निवेदन सादर केले. यावेळी खासदार मिलिंद देवरा, आमदार तुकाराम काते, शिवसेना सचिव संजय मोरे, माजी खासदार संजय निरुपम, उपनेत्या शीतल म्हात्रे, प्रवक्त्या ज्योती वाघमारे, सुशिबेन शहा, आशा मामेडी, संजना घाडी, सुवर्णा करंजे, शिशिर शिंदे, तृष्णा विश्वासराव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी सांगितले की, संजय राऊत देशविरोधी वक्तव्य करून समाजात तणाव निर्माण करत आहेत, त्यामुळे त्यांच्यावर तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे. राऊतांच्या विधानामुळे शहरात बॉम्बच्या अफवा, धमकीचे कॉल येणे यासारखे प्रकार घडू शकतात. त्यांनी याविषयी पोलिसांकडे चौकशी आणि देशद्रोहाचा गुन्हा नोंदवण्याची मागणी केली. पोलिस आयुक्त देवेन भारती संजय राऊतांवर कारवाई करतील की नाही, हे येत्या दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# राजकीय दबावाखाली प्रभाग रचना; माजी नगरसेवक चव्हाण यांचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेच्या नव्या प्रभाग रचनेविरोधात माजी नगरसेवक, माजी नगराध्यक्ष आणि काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष दीप नारायण चव्हाण यांनी तीव्र हरकत घेतली आहे. सर्व १७ प्रभागांच्या आरक्षणविरहित रचनेबाबत मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी कायद्याचे उल्लंघन, स्थानिक लोकप्रतिनिधींचा राजकीय दबाव आणि मागासवर्गीयांसह सर्व आरक्षित समाजावर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांची हरकत ज्येष्ठ विधिज्ञ अभिजित पुप्पाल यांच्या मार्फत नोंदविण्यात आली.



२०१८ च्या निवडणुकीत तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी राहुल द्विवेदी यांनी प्रभाग रचनेसह आरक्षण जाहीर केले होते. राज्य निवडणूक आयोगाच्या ३ मे २००५ च्या आदेशानुसार प्रत्येक प्रभागात अ, ब, क, ड प्रमाणे आरक्षण निश्चित करण्यात आले होते. मात्र, सद्याच्या रचनेत आरक्षणाचा उल्लेखच नाही, असा दावा करण्यात आला आहे. चव्हाण यांनी आपल्या प्रभागाचा भाग वेड्या-वाकड्या पद्धतीने फोडून ढोरवस्ती, बौधवस्ती, अण्णाभाऊ साठे झोपडपट्टीसारख्या मागासवर्गीय वस्त्यांना तीन प्रभागांमध्ये (५, ७ व १०) विभागल्याचा आरोप केला.

त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. ही विभागणी लोकप्रतिनिधींच्या सांगण्यावरून केल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले. सदर भाग पूर्वी प्रभाग ९ मध्ये होता. त्यावेळी तो डी. पी. रोडला धरून एकसंधपणे प्रभाग ५ मध्ये समाविष्ट करण्यात आला होता. आता मात्र या भागाची विभागणी करून प्रभाग १०, ५ व ७ मध्ये टाकल्याने रहिवाशांवर अन्याय होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. २०१८ मध्ये प्रभाग रचनेसोबत आरक्षण जाहीर करण्यात आले होते. मात्र, ३ सप्टेंबर २०२५ च्या अधिसूचनेत आरक्षणाचा कोणताही उल्लेख नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५अ नुसार प्रभाग रचनेसोबत अनुसूचित जाती, जमाती, मागासवर्गीय व महिलांसाठी आरक्षण जाहीर करणे बंधनकारक आहे. हा स्पष्ट कायद्याचा भंग झाल्याचा आरोप चव्हाण यांनी केला. मागील निवडणुकीत मागासवर्गीय समाजासाठी ९ जागा राखीव होत्या. मात्र, नव्या रचनेत त्या कमी करून ८ केल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. ''हा निर्णय मागासवर्गीय समाजाच्या राजकीय हक्कांवर गदा आणणारा आणि अन्यायकारक आहे,'' असे चव्हाण म्हणाले. ही प्रभाग रचना बेकायदेशीर, अन्यायकारक व असंवैधानिक असल्याचे सांगत चव्हाण यांनी अधिसूचना तातडीने रद्द करून २०१८ च्या रचनेप्रमाणे प्रभाग कायम ठेवण्याची मागणी केली आहे. त्यांनी महाराष्ट्र निवडणूक आयोग, नगर विकास विभाग, मुख्यमंत्री तसेच नगर विकास मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे. अधिसूचना रद्द न झाल्यास राज्य निवडणूक आयोगाकडे दाद मागावी लागेल, असेही चव्हाण यांनी स्पष्ट केले.

# एआय क्षेत्रात रोजगाराच्या असीम संधी- अनिकेत कर्डिले

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात सेमिनार संपन्न

**अहमदनगर । रयत समाचार**

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागात आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर सेमिनारचे आयोजन करण्यात आले. या सेमिनारचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर यांच्या हस्ते झाले. यावेळी ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. सुदर्शन दिवटे उपस्थित होते. या कार्यक्रमाला विविध विभागांतील सुमारे २२५ विद्यार्थी सहभागी झाले. या सेमिनारसाठी मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले एक्सपर्ट श्री. अनिकेत कर्डिले (बिझनेस ॲनालिस्ट, ऊनछ झ्रीीं. डींव., हैद्राबाद) यांनी विद्यार्थ्यांना ए.आय. क्षेत्रातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल नेटवर्किंग प्लॅटफॉर्मचा उपयुक्त उपयोग आणि रोजगाराच्या नव्या शक्यता यावर त्यांनी भर दिला. ए.आय. मुळे रोजगार जाण्याची भीती चुकीची असून, उलट या क्षेत्रात भविष्यात रोजगाराच्या नवीन दालने खुली होतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच विद्यार्थ्यांनी कौशल्यविकास अभ्यासक्रमांचा अवलंब करून स्वतःची गुणवत्ता वाढवावी, स्टार्टअप्ससाठी ए.आय. चा वापर करून नवे व्यवसाय उभारावेत, असे आवाहन त्यांनी केले. सेमिनार यशस्वी होण्यासाठी विभागप्रमुख प्रा. विद्या जगताप यांनी पुढाकार घेतला. प्रा. अंजली फलटणे व प्रा. जे. ई. घायतडक यांचे सहकार्य लाभले. यावेळी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा. सुनील कल्हापुरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत ए.आय. व डेटा सायन्स तंत्रज्ञान हे केवळ रोजगारापुरते मर्यादित नसून सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठीही उपयुक्त ठरू शकते, असे सांगितले. विद्यार्थी संशोधन व नवनवीन कल्पना मांडून समाजातील बदलत्या गरजांना न्याय देऊ शकतात, असेही त्यांनी प्रतिपादन केले. या उपक्रमासाठी फौंडेशनचे डायरेक्टर जनरल डॉ. पी.एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि पालकमंत्री व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून आत्मविकासासाठी नवी दिशा मिळाल्याचे समाधान व्यक्त केले.



# राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धेत आनंद गुरुकुलचे घवघवीत यश

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर येथे नुकतीच एक्स्पर्ट अबॅकस अकॅडमी आयोजित १५ वी राज्यस्तरीय अबॅकस स्पर्धा आणि बक्षीस वितरण कार्यक्रम पार पडला. या स्पर्धेत विविध जिल्ह्यांतील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे अध्यक्ष विकास कोटकर व मनीषा कोटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेत श्री आनंद पार्श्व गुरुकुल स्कूलच्या २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सहभागी सर्वच विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर टॉप-८ मध्ये स्थान पटकावून यश संपादन केले. यामध्ये पार्थ गणेश टाटिया (प्रथम क्रमांक), आरूष सुनील घेंबुड (पाचवा क्रमांक), शिवन्या प्रदीप परदेशी (पाचवा क्रमांक), जैना अमोल पारख (पाचवा क्रमांक), विधी मयूर बोरा (पाचवा क्रमांक), राजनंदिनी मनोज कोठुळे (पाचवा क्रमांक), सई विनोद मुळीक (पाचवा क्रमांक), शिवांश किशोर म्हसे (पाचवा क्रमांक), प्रणवी संदीप गिऱ्हे (सहावा क्रमांक), आस्था रितेश पारख (आठवा क्रमांक), गौरी राजेंद्र दळवी (आठवा क्रमांक), श्रीजा प्रदीप परदेशी (आठवा क्रमांक), वेदिका जगदीश आंबेकर (आठवा क्रमांक), वेकरिया जिनेश मयूर (आठवा क्रमांक), प्रिन्स अमित कुमार (आठवा क्रमांक), स्वरा संदीप तळेकर (आठवा क्रमांक), हितिषा अमोलजी पारख (आठवा क्रमांक), गायत्री संदीप गिऱ्हे (आठवा क्रमांक), परिधी संचेती (आठवा क्रमांक) व सोलंकी रियांशिबा जयसिंग (आठवा क्रमांक) यांचा समावेश आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना श्री आनंद पार्श्व गुरुकुल शाळेचे कुंदनऋषि व आलोकऋषि, मेघा मयूर बोरा आणि मुख्याध्यापिका कादंबरी राजेश सुर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

# प्रभाग रचनेवर खासदार निलेश लंके यांची हरकत

## आरक्षणाचा उल्लेख टाळून केलेले प्राधिकृत प्रकाशन कायद्याच्या विरोधात असल्याचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नव्या प्रभाग रचनेवर खासदार निलेश लंके यांनी तीव्र हरकत घेतली असून जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर केले आहे. ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप प्रभागांच्या भूसीमा अधिसूचनेला रद्द करण्याची मागणी त्यांनी केली आहे. लंके यांनी नमूद केले की, नव्या प्रभाग रचनेत अनुसूचित जाती-जमाती, मागासवर्गीय व महिलांसाठी राखीव जागांचा तपशील दिलेला नाही. ही बाब भारतीय संविधानातील कलम १६,



२४३(टी), २४३(एस) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ५(अ) च्या तरतुदींना विरोध करणारी आहे. त्यांनी आरोप केला की प्रभाग रचना गुगल मॅपवर वाकड्या-तिकड्या रेषा मारून, मतदारसंघांची ताटातूट करून करण्यात आली आहे. ''राजकीय विरोधकांना संपवण्यासाठीच हा डाव आखला गेला आहे,'' असा आरोप त्यांनी केला. २०१८ च्या महानगरपालिका निवडणुकीत तत्कालीन आयुक्तांनी प्रत्येक प्रभागाचे आरक्षण स्पष्ट करून हरकती मागवल्या होत्या. मात्र यावेळी ती प्रक्रिया पाळली नसल्याने नागरिकांचा मूलभूत अधिकार हिरावला गेला आहे, असेही त्यांनी निदर्शनास आणले. नगरविकास विभागाच्या १० जून २०२५ च्या आदेशानुसार प्रभाग सीमा आखताना मोठे रस्ते, नद्या, नाले, डोंगर, रेल्वे रुळ यांसारख्या नैसर्गिक मर्यादांचा विचार होणे अपेक्षित होते. मात्र सद्याच्या रचनेत या नियमांचे उल्लंघन झाल्याचे लंके यांनी अधोरेखित केले. त्यामुळे २०१८ प्रमाणेच जुनी प्रभाग रचना कायम ठेवूनच आगामी निवडणूक घ्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली आहे.

# १४ सप्टेंबरला 'आनंद बाल' मेळावा

**अहमदनगर । पंकज गुंदेचा**

आनंदधाम येथे रविवारी, १४ सप्टेंबर रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत आनंद बाल वार्षिक स्नेहसंमेलनाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रवर्तक पू. कुंदनऋषि म.सा., वात्सल्य मूर्ती डॉ. पू. दर्शनप्रभा म.सा., तसेच विदुषी डॉ. श्री अनुपमा म.सा. यांच्या सानिध्यात करण्यात आले.

१९ व्या शतकातील महान राष्ट्रसंत आचार्य सम्राट पू. श्री आनंदऋषिजी म.सा. यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक कार्याची आठवण ठेवत हा कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. आचार्यश्रींच्या मार्गदर्शनाखाली भारतभर अनेक जैन पाठशाळा स्थापन झाल्या, ज्या बालकांमध्ये शिक्षणाबरोबरच सुसंस्कार रुजविण्यासाठी कार्यरत आहेत. आनंद नवकार परिवार ट्रस्ट अंतर्गत आनंद जैन पाठशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रोत्साहन करण्यासाठी तसेच त्यांच्या कला व गुणांचे कौतुक करण्यासाठी हा वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात प्रतिक्रमण व श्री भक्तामर स्तोत्र कंठस्थ केलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच त्यांना घडवणाऱ्या अध्यापिका व क्षेत्रप्रमुखांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम, अनाम-प्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांचे भजन, जादूचे प्रयोग आणि ड्रॉईंग-क्राफ्ट यांचा समावेश आहे.

याशिवाय, ए टू झेड परिवारतर्फे २०२४ मध्ये आयोजित तीर्थंकर नेमिनाथ अवार्डची पारितोषिक वितरण समारंभ देखील करण्यात आला, ज्याचे सन्मान सूर्यकांता रसिकलालजी कोठारी, अहिल्यानगर यांना करण्यात आले. ट्रस्ट व श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी आणि कार्यक्रम अधिक स्फूर्तिदायक होण्यासाठी बंधु-भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीचे ६ खेळाडू अहिल्यानगर बास्केटबॉल संघात

**अहमदनगर । रयत समाचार**

सोलापूर येथे होणाऱ्या सब ज्युनिअर बास्केटबॉल स्पर्धेसाठी केडगाव स्पोर्ट्स अकॅडमीच्या सहा खेळाडूंची अहिल्यानगर सब ज्युनिअर संघात निवड झाली आहे. निवड झालेल्या खेळाडूंमध्ये ध्रुव गुगळे, आदिराज कोतकर, कृष्णा ठुबे, यश सोले, आर्यन वाघचौरे आणि तनिष्का बारहाते यांचा समावेश आहे. ता. १० ते १५ सप्टेंबर दरम्यान



सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य बास्केटबॉल असोसिएशनतर्फे स्पर्धेला प्रारंभ झाला असून, या स्पर्धेमध्ये निवड झालेल्या खेळाडूंना अहिल्यानगर संघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे. खेळाडूंना प्रशिक्षक छबुराव कोतकर व स्वाती बारहाते यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, प्राध्यापक प्रसाद जमदाडे, डॉ. देवेशकुमार बारहाते, पत्रकार विक्रम लोखंडे तसेच संघटनेचे अध्यक्ष बाबासाहेब कोतकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत आर्मी पब्लिक स्कूल, तक्षिला स्कूल व फिरोदिया स्कूल विजयी



**अहमदनगर । रयत समाचार**

फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत शुक्रवारी (दि. १२ सप्टेंबर) झालेल्या सामन्यांमध्ये मुलांच्या विविध वयोगटांमध्ये आर्मी पब्लिक स्कूल, तक्षिला स्कूल आणि अशोकभाऊ फिरोदिया स्कूलने विजय मिळवला. सकाळच्या सत्रात १४ वर्ष वयोगटातील मुलांच्या सामन्यात कर्नल परब स्कूल विरुद्ध अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. कर्नल परब स्कूलकडून अथर्व तोडमलने १ गोल केला, तर अशोकभाऊ फिरोदिया स्कूलकडून उमेर शेखने २ गोल करत संघाला २-१ असा विजय मिळवून दिला.


१२ वर्ष वयोगटातील मुलांच्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने ज्ञानसंपदा स्कूलचा २-० असा पराभव केला. या सामन्यात हर्ष नेहारकर आणि संकल्प जाधव यांनी प्रत्येकी १ गोल केला. १६ वर्ष वयोगटातील सामन्यात आर्मी पब्लिक स्कूलने दमदार खेळ करत ज्ञानसंपदा स्कूलवर ४-० अशी एकतर्फी मात केली. प्रज्वल, वेदांत म्हस्के, वीरेंद्र वीर आणि अभिनव जी. यांनी प्रत्येकी १ गोल केला.

दुपारच्या सत्रात १७ वर्षांखालील मुलींच्या सामन्यात आर्मी पब्लिक स्कूल व कर्नल परब स्कूल यांच्यात रंगतदार खेळ झाला. दोन्ही संघांनी आक्रमक खेळी केली, मात्र एकाही संघाला गोल करता आला नाही. त्यामुळे सामना ०-० असा अनिर्णित राहिला. १२ वर्ष वयोगटातील मुलांच्या सामन्यात तक्षिला स्कूल व कर्नल परब स्कूल यांच्यातील लढत देखील अत्यंत अटीतटीची ठरली. तक्षिलाच्या अभिनव मोरेने २ गोल करत संघाचा विजय निश्चित केला. कर्नल परबकडून प्रद्युम्न शेळकेने १ गोल केला. अखेरीस २-१ ने तक्षिला स्कूलचा संघ विजयी ठरला.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११९३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# बाबुजी आव्हाड महाविद्यालयात ‘जल्लोष २०२५’ एकांकिका महोत्सव



**पाथर्डी । प्रतिनिधी**

नाटकांमध्ये संगीत, नृत्य, गायन व अभिनय या सर्व कलांचा अविष्कार असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच अभिनयकलेला प्रोत्साहन मिळण्यासाठी महाविद्यालयांमध्ये एकांकिका व नाट्यमहोत्सवाचे नियमित आयोजन होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले. येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक विभाग आयोजित तालुकास्तरीय एकांकिका महोत्सव ‘जल्लोष २०२५’ च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे होते. व्यासपीठावर उपाध्यक्ष सुरेशराव आव्हाड, श्री विवेकानंद विद्या मंदिरचे मुख्याध्यापक शरद मेढे, अविनाश मंत्री, राजेंद्र सावंत, अमोल कांकरिया, अनिल खाटेर, मकरंद घोडके, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. अशोक डोळस, डॉ. वैशाली आहेर, प्रा. विजय म्हस्के व प्रा. अनिल म्हस्के उपस्थित होते. श्री. आव्हाड म्हणाले की, ‘‘भारतीय नाट्यशास्त्राला प्राचीन परंपरा लाभलेली आहे. नाटक हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम राहिले आहे. मात्र आजच्या सोशल मिडिया व ओटीटीच्या युगात नाटक या जिवंत कलेला नवसंजीवनी मिळावी यासाठी महाविद्यालय स्तरावर अशा महोत्सवांचे आयोजन होणे आवश्यक आहे. हिरक महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित एकांकिका महोत्सव विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा ठरेल.’’ एकांकिका महोत्सवात विविध महाविद्यालयांनी नाटके सादर केली. बाबुजी आव्हाड महाविद्यालय ‘आम्ही यशवंत ऋणी बाबुजींचे’ आनंद कनिष्ठ महाविद्यालय, चिचोंडी ‘तिचा आक्रोश’. श्री आनंद महाविद्यालय ‘चवदार तळे’ श्री विवेकानंद विद्या मंदिर ‘शिक्षण हा आमचा अधिकार’ न्यू आर्ट्स, कॉमर्स व सायन्स कॉलेज, शेवगाव ‘मंचलाईट’ बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालय ‘साक्षरतेचे दीप स्त्री शिक्षण’ यामध्ये ‘आम्ही यशवंत ऋणी बाबुजींचे’ या नाटकास प्रथम, ‘मंचलाईट’ ला द्वितीय तर ‘साक्षरतेचे दीप स्त्री शिक्षण’ या नाटकास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. उत्कृष्ट सांघिक अभिनयाचा पुरस्कार ‘चवदार तळे’ या एकांकिकेला मिळाला. तसेच शाहीर या भूमिकेसाठी वरून सानप या विद्यार्थ्याला उत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. परीक्षक म्हणून राम कोरडे व योगेश रोकडे यांनी काम पाहिले. महोत्सवाची सुरुवात नाट्यदिंडी व नटराज पूजनाने झाली. सर्व नाटकांना उपस्थित विद्यार्थी व नाट्यरसिकांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक डोळस यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. वैशाली आहेर यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. भगवान सांगळे यांनी मानले.



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर सेवा पंधरवडा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर व राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत ‘‘सेवा पंधरवडा’’ म्हणून साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात तसेच त्यानंतरही विविध उपक्रम राबविले जाणार असून या विशेष मोहिमेत तीन टप्प्यांमध्ये कार्यवाही केली जाणार आहे. पहिला टप्पा पाणंद रस्तेविषयक मोहीम (१७ ते २२ सप्टेंबर २०२५) या कालावधीत शिव पाणंद रस्त्यांचे सर्वे क्षण, नोंदणी नसलेल्या रस्त्यांची नोंद घेणे, शेतावर जाण्यासाठी आवश्यक रस्त्यांसाठी संमतीपत्रे घेणे, रस्ता अदालत आयोजित करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे अशी कामे केली जातील. तसेच रस्त्यांवरील अतिक्रमणे हटविणे व त्यांची नोंद निस्तार पत्रकात घेण्याची प्रक्रिया राबवली जाईल. दुसरा टप्पा सर्वांसाठी घरे (२३ ते २७ सप्टेंबर २०२५) या उपक्रमांतर्गत घरकुल बांधण्यासाठी उपलब्ध शासकीय जमिनी कब्जेहक्काने प्रदान करणे, अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित करणे, लाभार्थ्यांना जमिनींचे वाटप करणे, खाजगी मिळकतींवर पट्टे वाटप करणे, तसेच घरांसाठीची अतिक्रमणे नियमानुसार वैध करणे अशी कार्यवाही केली जाणार आहे. तिसरा टप्पा नाविन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५) या टप्प्यात जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार कुळकायदा, पुनर्वसन आदीशी संबंधित नोंदी कमी करण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. यासोबतच भटके विमुक्त जातींच्या लोकांना जातीचे दाखले, ओळखपत्रे, आधारकार्ड आदी मिळवून देण्यासाठी विविध ठिकाणी शिबिरे आयोजित केली जातील. या सेवा पंधरवड्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन श्रीकुमार चिंचकर (उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा–पारनेर) व सचिन डोंगरे (तहसिलदार, श्रीगोंदा) यांनी केले आहे.

# कृषी विकासाला प्राधान्य देणारे शासन- मंत्री जयकुमार रावल

## अहिल्यानगर येथे संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारणार



**नगर तालुका । रयत समाचार**

कृषी विकासाला प्राधान्य देणारे हे शासन असून शेतकरी व ग्राहक यांच्यातील दुवा मजबूत करण्यासाठी थेट विक्रीची व्यवस्था पणन मंडळाद्वारे केली जात आहे, असे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

चिचोंडी पाटील येथे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवाराचे भूमिपूजन करताना ते बोलत होते. यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार शिवाजी कर्डीले, डॉ. सुजय विखे पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मंत्री रावल म्हणाले की, राज्यात ३०६ बाजार समित्या व ६२१ उपबाजार असून अडीच लाख मेट्रिक टन माल विक्रीतून ८५ हजार कोटी रुपयांचा व्यवहार होतो. शेतकऱ्यांच्या मालाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी महामुंबई आंतरराष्ट्रीय कृषी उत्पन्न बाजार समिती स्थापन होत आहे. अहिल्यानगर येथे दीड कोटी रुपयांचा संत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यात येणार असून बाजार समितीमार्फत निर्यात सुविधा उपलब्ध होईल. शेतकऱ्यांच्या मुलांना निर्यात प्रशिक्षण देण्याचीही व्यवस्था केली जाणार आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी बदलत्या काळात डिजिटल मार्केटिंग स्वीकारण्याचे आवाहन केले व शेतकऱ्यांच्या हिताशी कुठलीही तडजोड होणार नाही, असे स्पष्ट केले.

# सिव्हील हडको परिसर प्रभाग रचना चुकीची; नागरिकांची हरकत

**अहमदनगर । रयत समाचार**

महापालिकेने ता. ३ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा अधिसूचनेत सिव्हील हडको परिसरातील काही भाग प्रभाग क्रमांक ६ मध्ये समाविष्ट करण्यात आल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात नागरिक व संभाव्य उमेदवार चंद्रकांत (काका) शेळके यांनी महापालिका आयुक्तांकडे औपचारिक हरकत नोंदवली आहे.



शेळके यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, सिव्हील हडको परिसर पूर्वी एकाच प्रभागात (प्रभाग ३) होता. मात्र, यावेळी प्रभाग रचनेतून काही भाग प्रभाग ६ मध्ये हलविण्यात आला असून त्यामुळे मतदार यादीतील तुकडे झाले आहेत. डी.पी. रोड, झोपडी कॅन्टीन ते टी.व्ही. सेंटर रोड या नैसर्गिक मर्यादेनुसार प्रभाग निश्चित करणे आवश्यक असताना प्रभाग रचना वाकडी-तिकडी पद्धतीने करण्यात आली आहे, ज्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९५९ चा भंग झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. सिव्हील हडको भागात सुमारे ८०० घरे असून त्यातील अर्धी घरे प्रभाग ३ व उर्वरित अर्धी प्रभाग ६ मध्ये विभागली गेल्याने नागरिकांवर अन्याय झाल्याचे शेळके यांनी सांगितले. ‘‘आमचा संपूर्ण परिसर सिव्हील हडको, गायकवाड मळा, भगत मळा, लोकमत भवन, रासने कॉलनी एकत्र ठेवून प्रभाग ३ मध्येच समाविष्ट करावा,‘‘ अशी नागरिकांची मागणी आहे. नगरविकास विभागाच्या दि. १० जून २०२५ च्या आदेशानुसार प्रभागांच्या सीमा मोठे रस्ते, नाले, डोंगर यांसारख्या नैसर्गिक मर्यादा लक्षात घेऊन आखाव्यात आणि कोणत्याही परिस्थितीत एका वसाहतीतील घरे वा इमारती दोन प्रभागात विभागली जाऊ नयेत, असे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र, या तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचे त्यांनी म्हटले. याशिवाय प्रभाग आरक्षणाबाबतही यावेळी महापालिकेच्या अधिसूचनेत कोणताही उल्लेख नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. २०१८ च्या निवडणुकीत तत्कालीन आयुक्तांनी प्रभागनिहाय आरक्षण स्पष्टपणे जाहीर केले होते. मात्र, यावेळी आरक्षणाची माहिती गाळण्यात आली असून हा नागरिकांच्या घटनात्मक अधिकारांचा भंग असल्याचा आरोप त्यांनी केला. सदर अधिसूचना बेकायदा ठरवत ती तातडीने रद्द करावी आणि सन २०१८ प्रमाणे प्रभाग रचना ठेवूनच निवडणुका घ्याव्यात, अशी ठाम मागणी काका शेळके यांनी केली आहे.

# मोबाईल व्यसनावर मात करण्यासाठी मनावर ताबा व छंदांना प्राधान्य द्या– मुक्ता चैतन्य



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

‘‘मनावर ताबा ठेवणे आणि सकारात्मक छंदांना वेळ देणे हे मोबाईल व्यसनापासून दूर राहण्याचे प्रभावी उपाय आहेत,‘‘ असे प्रतिपादन प्रसिद्ध सायबर तज्ज्ञ मुक्ता चैतन्य यांनी केले. भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित गंगा मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेत ‘मोबाईलचे व्यसन आणि आव्हाने’ या विषयावर त्या बोलत होत्या.

यावेळी माजी विद्यार्थी, पोलीस उपनिरीक्षक सतीश गोरे यांचा जलसंधारण उपसचिव मृदुला भारदे आणि निमंत्रक हरीश भारदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुक्ता चैतन्य यांनी मोबाईलचा सुयोग्य वापर, फिशिंग, ऑनलाइन फसवणूक, सायबर गुन्हे तसेच ऑनलाइन फुटप्रिंट्स याबाबत सखोल मार्गदर्शन केले. मोबाईलच्या अति वापरामुळे मानसिक, शारीरिक आणि मेंदूवर होणाऱ्या परिणामांची माहिती देत त्यांनी पालकांनी मुलांना मोबाईलच्या आहारी जाण्यापासून वाचवण्यासाठी काय काळजी घ्यावी यावरही मार्गदर्शन केले. पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी सडेतोड उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रमेश भारदे होते. व्यासपीठावर रागिणी भारदे, प्रा. संजय कुलकर्णी उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब घावटे यांनी केले. परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दरम्यान, गंगा मृणालिनी स्मृती व्याख्यानमालेतील सहावे पुष्प म्हणून उद्या ता. १३ सप्टेंबर प्रसिद्ध पत्रकार राजीव खांडेकर यांचे व्याख्यान होणार आहे.

# प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा; जमिनी वर्ग दोनमधून एक होणार– चंद्रशेखर बावनकुळे

**नेवासा । विजय खंडागळे**



राज्यातील व जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनी वर्ग दोन मधून एकमध्ये करण्यास मोठ्या अडचणी येत होत्या. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगार प्रकल्पग्रस्त संघटनेचे अध्यक्ष संजयभाऊ धनाडे यांनी शनिवारी (दि. ६) कोराडी येथे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या संदर्भात निवेदन सादर केले. या अनुषंगाने मंत्री बावनकुळे यांनी अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांना दूरध्वनीवरून आवश्यक ती विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. परिणामी जिल्ह्यातील व राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी वर्ग दोन मधून एकमध्ये करण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. या भेटीदरम्यान पत्रकार विजय खंडागळे, प्रकल्प कृती बचाव समितीचे दिगंबर आवारे यांच्यासह विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी उपस्थित होते. राज्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आपली जमिनी वर्ग दोनवरून एकमध्ये करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जिल्हास्तरीय कार्यालयात जमा करावीत, असे आवाहन संघटनेचे नेते संजय धनाडे यांनी केले आहे. यामुळे प्रकल्पग्रस्तांना शासकीय योजनेचा लाभ, अनुदान, कर्ज व अन्य सुविधा मिळू शकतील. या निर्णयामुळे सर्व शेतकरी प्रकल्पग्रस्तांमध्ये शासन व संघटनेबद्दल समाधान व अभिनंदनाचे वातावरण आहे.

# अनेकांचे स्वप्न धुळीला; जि.प.अध्यक्षपद अनुसूचित जमाती महिला राखीव

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षपदांच्या आरक्षणाची प्रतिक्षा संपली असून आज (१२ सप्टेंबर) राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर केले. या सोडतीत अहिल्यानगर जिल्हा परिषद अध्यक्षपद अनुसूचित जमाती (महिला) या वर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे.



झेडीपीचे अध्यक्ष होण्याचे अनेकांचे स्वप्न धुळीस मिसळले असून आता राखीव प्रवर्गातील आपल्याला मर्जीतील महिला उमेदवार शोधण्याचा नेत्यांचा प्रयत्न असणार आहे. आता पुढच्या आरक्षणावर आणखी काहींची स्वप्न ठरणार आहेत. गेल्या काही आठवड्यांपासून आरक्षण सोडतीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आता आरक्षण जाहीर झाल्याने जिल्ह्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. विविध राजकीय पक्षांतून आगामी निवडणुकीसाठी नियोजन व उमेदवार ठरवण्याच्या हालचाली सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत. दरम्यान, दिवाळीनंतरच राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा बिगुल वाजणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आरक्षणाच्या घोषणेमुळे आता सर्व राजकीय पक्षांनी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. अनुसूचित जमाती (महिला) आरक्षणामुळे जिल्ह्यातील अनेक महिलांना नेतृत्वाची नवी संधी मिळणार असून आगामी निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता असून ते अकोले तालुक्याकडे राहण्याची शक्यता आहे.

# संजीवनीच्या विद्यार्थिनींची ‘एमयूएन’ आंतरराष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी

**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या शिर्डी येथील विद्यार्थ्यांनी बेंगळूर येथील जैन इंटरनॅशनल स्कूल आयोजित सातव्या ‘मॉडेल युनायटेड नेशन्स’ (एमयूएन) या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक स्पर्धेत उत्तुंग यश मिळवले. अकरा विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला असून त्यापैकी राजविका अमित कोल्हे आणि तन्वी अतुल गोंदकर यांना ‘उत्कृष्ट प्रतिनिधित्व’ पुरस्कार प्राप्त झाला. संचालिका डॉ. मनाली कोल्हे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या परिषदेत लिटरेचर चॅप्टर एक्स या समिती अंतर्गत राजविकाने ‘अनाबेथ चेस’ तर तन्वीने ‘मेडूसा’ ही भूमिका साकारून



लक्षवेधी कामगिरी केली. त्यांच्या प्रतिभा, सादरीकरणातील सफाईदार देहबोली आणि प्रभावी मांडणीमुळे त्यांना हा सन्मान मिळाल्याचे त्या म्हणाल्या. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या विविध समित्यांमध्ये वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधित्व करीत ‘युनायटेड नेशन्स ऑफिस ऑन ड्रग्ज’, ‘युनायटेड नेशन्स ह्युमन राईट्स कौन्सिल’, ‘डिसार्मामेंट अँड इंटरनॅशनल सिक्युरिटी कमिटी’ अशा ज्वलंत विषयांवर आपले विचार प्रभावीपणे मांडले. यात सिध्दी तांबे (जर्मनी), अद्वैता पानगे (जपान), सुरभी जगताम (आर्मेनिया), वीरा विखे (अझेरबैजान), मीत कोळी (अलबेनिया), शाश्वत कुमार (ब्राझील), रितिका गोंदकर (चिले), अद्वैत फोपसे (जपान) व भूवी कोठारी (इंडोनेशिया) यांनी सहभाग घेतला. संजीवनी शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष नितिन कोल्हे व कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या वेळी डायरेक्टर ऑफ स्कूल ऑडिट अँड कम्प्लायंसेस सुंदरी सुब्रमण्यम, प्राचार्या रीना राजपुत व हेड मिस्ट्रेस रेखा साळुंके उपस्थित होत्या. एमयूएन हा एक शैक्षणिक उपक्रम असून यात विद्यार्थी वेगवेगळ्या देशांचे प्रतिनिधित्व करून हवामान बदल, दहशतवाद, मानवाधिकार, गरीबी, आरोग्य यांसारख्या आंतरराष्ट्रीय विषयांवर चर्चा, वादविवाद व वाटाघाटी करून उपाय शोधतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांचे भाषणकौशल्य, संवादकौशल्य, नेतृत्वगुण, समूहकार्यपद्धती व जागतिक दृष्टिकोन विकसित होतो. यंदा पाचशेहून अधिक स्पर्धकांतून संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश कौतुकास्पद असल्याचे डॉ. कोल्हे यांनी सांगितले.

# फिरकीचा जादूगार शेन वॉर्न

फिरकीचा जादुगार शेन वॉर्न याची आज जयंती. साडेतीन वर्षापूर्वी (४ मार्च २०२२) रोजी क्रिकेट विश्वाला धक्का देणारी बातमी आली आणि या बातमीने संपूर्ण क्रिकेट विश्वावर शोककळा पसरली. ही बातमी होती फिरकीचा जादूगार ऑस्ट्रेलियाचा महान लेग स्पिनर शेन वॉर्न यांच्या निधनाची. शेन वॉर्नच्या आकस्मिक निधनाची बातमी क्रिकेट रसिक पचवू शकले नाही. अनेकांचा या बातमीवर विश्वास बसत नव्हता. शेन वॉर्न असा अकाली निघून गेल्याने क्रिकेट विश्वाला जबर धक्का बसला. शेन वॉर्न जाऊन आज साडेतीन वर्ष झाली तरी या धक्क्यातून क्रिकेट रसिक अजूनही सावरू शकले नाही. वयाच्या अवघ्या ५२ व्या वर्षी या महान गोलंदाजाने जगाचा निरोप घेतला. शेन वॉर्न हा केवळ ऑस्ट्रेलियाचाच नाही तर जगातला सर्वोत्तम फिरकी गोलंदाज होता.



आपल्या फिरकीच्या तालावर त्याने जगातील सर्वच दिग्गज फलंदाजांना नाचवले. जवळपास वीस वर्ष त्याने आपल्या फिरकीच्या बळावर क्रिकेट विश्वावर राज्य केले. १३ सप्टेंबर १९६९ रोजी ऑस्ट्रेलियाच्या फॉन्टरी गली येथे जन्मलेल्या शेन वॉर्नने जेंव्हा फिरकी गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा त्याला सर्वांनी वेड्यात काढले कारण ऑस्ट्रेलिया म्हणजे वेगवान गोलंदाजांची भूमी . खेळपट्ट्या वेगवान त्यामुळे तिथे त्याची फिरकी चालणार नाही असेच सर्वांचे मत होते. अनेकांनी त्याला फिरकी गोलंदाजी न करण्याचा सल्ला दिला मात्र त्याने कोणाचेही ऐकले नाही. तो आपल्या निर्णयावर ठाम राहिला. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्याने चमकदार कामगिरी करून निवड समितीचे लक्ष वेधले. सातत्याने चांगली गोलंदाजी केल्याने अखेर त्याला ऑस्ट्रेलियाच्या मुख्य संघात प्रवेश मिळाला. १९९२ साली त्याने भारताविरुद्धच त्याने आपली पहिली कसोटी खेळली मात्र या कसोटीत त्याला विशेष काही करता आले नाही. भारताच्या फलंदाजांनी त्याची गोलंदाजी लीलिया खेळून काढली. याच कसोटीत भारताचा सलामीवीर रवी शास्त्रीने द्विशतक केले. पहिल्या कसोटीत विशेष काही करता न आल्याने त्याच्यावर टीकाही झाली. तो आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी होणार नाही असाही तर्क अनेकांनी काढला मात्र त्याने हार मानली नाही. टिकाकारांकडे दुर्लक्ष केले आणि आपल्या गोलंदाजीवर लक्ष केंद्रित केले. त्याचे फळ त्याला लवकरच मिळाले. इंग्लंड विरुद्धच्या प्रतिष्ठेच्या एशेस मालिकेत त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना सलो की पळो करून सोडले. आपल्या फिरकीच्या बळावर त्याने ही मालिका ऑस्ट्रेलियाला एकहाती जिंकून दिली. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नची फिरकी समजलीच नाही. इंग्लंड फलंदाजांना शेन वॉर्नने अक्षरशः मामा बनवले. याच मालिकेत शेन वॉर्नने असा चेंडू टाकला की ज्याने फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच अचंबित झाले. शेन वॉर्नने इंग्लंडच्या माईक गार्टिंगला ऑफ साईडला चेंडू टाकला. गार्टिंगला वाटले की चेंडू ऑफ स्टंपच्या बाहेर असल्याने तो वाईड ठरेल म्हणून त्याने तो सोडून दिला मात्र चेंडूने अचानक १८० अंशात वळून चक्क गार्टिंगचा लेग स्टंपवर धडकला. या चेंडूने केवळ फलंदाजच नव्हे तर क्रिकेट विश्वच हादरून गेले. असा चेंडू यापूर्वी क्रिकेट विश्वात कोणत्याची गोलंदाजाने टाकला नव्हता म्हणूनच या चेंडूला बॉल ऑफ सेंच्युरी असे म्हणतात. न भूतो न भविष्यती असा तो चेंडू होता. १९९३ साली शेन वॉर्नने हा स्वप्नवत चेंडू टाकला. आज इतक्या वर्षानंतरही हा चेंडू क्रिकेट रसिकांच्या स्मरणात आहे.

शेन वॉर्नची गोलंदाजीची शैली अनोखी होती. या अनोख्या शैलीनेच त्याने १४५ कसोटीत ७०८ बळी घेतले. त्यातील ४४८ बळी हे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडमध्ये घेतले. येथे एक लक्षात घ्यावे लागेल की या दोन्ही देशातील खेळपट्ट्या वेगवान गोलंदाजीसाठी पोषक असतात. वेगवान खेळपट्ट्यांवर इतके बळी मिळवणे ही अनन्यसाधारण गोष्ट आहे. त्याने १४५ कसोटीत खेळताना ३७ वेळा एका डावात ५ किंवा त्यापेक्षा अधिक बळी घेतले आहेत तर तर कसोटीत १० किंवा १० पेक्षा अधिक बळी त्याने १० वेळा घेतले आहेत. इतकेच नाही तर त्याने १९४ एकदिवसीय सामन्यात २९३ बळी घेतले आहेत. १९९९ साली इंग्लंडमध्ये झालेला विश्वचषक ऑस्ट्रेलियाने शेन वॉर्नच्या फिरकीच्या बळावरच जिंकला होता.

शेन वॉर्नने जगभरातील दिग्गज फलंदाजांना आपल्या फिरकीच्या तालावर अक्षरशः नाचवले. जगातील सर्वच देशात त्याने अप्रतिम कामगिरी करीत बळी मिळवले मात्र त्याला भारतात म्हणावे तसे यश मिळाले नाही. सचिन आणि वॉर्न यांचे क्रिकेट मैदानावरील द्वंद्व क्रिकेट रसिकांसाठी पर्वणी ठरायचे. सचिनला बाद करण्यासाठी वॉर्न जंग जंग पछाडायचा मात्र त्याला त्यात यश मिळायचे नाही. शारजात झालेल्या मालिकेत सचिनने वॉर्नची चांगलीच पिटाई केली तेंव्हा सचिन मला स्वप्नातही दिसतो अशी कबुली त्याने दिली होती. मैदानावर हे दोन महान खेळाडू एकमेकांसमोर उभे ठाकत असले तरी मैदानाबाहेर मात्र हे दोघे एकमेकांचे जिवलग मित्र होते. १९९० ते २०१० असे वीस वर्ष ऑस्ट्रेलियाने क्रिकेट विश्वावर एकहाती हुकूमत गाजवली त्यात शेन वॉर्नचा मोठा वाटा होता. निवृत्तीनंतर शेन वॉर्नने समालोचन केले. २००८ साली आयपीएलचा पहिले सत्र पार पडले. या पहिल्या सत्रात शेन वॉर्न राजस्थान रॉयल्स या संघाचा कर्णधार होता. विशेष म्हणजे या संघात शेन वॉर्न वगळता एकही स्टार खेळाडू नव्हता. या संघात तरुण आणि नवख्या खेळाडूंचा भरणा होता तरीही शेन वॉर्नने आपल्या चतुरस्त्र गोलंदाजीने आणि नेतृत्व गुणाने राजस्थान रॉयल्स ला विजेतेपद मिळवून दिले. शेन वॉर्नच्या मृत्यू नंतर क्रिकेट विश्वाची मोठी हानी झाली. त्याच्या सारखा महान फिरकी गोलंदाज पुन्हा होणार नाही. फिरकीचा जादूगार शेन वॉर्नला जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


समाजसंवाद

# तालीम ही केवळ शरीरसौष्ठव देणारी जागा नसून जिद्द, चिकाटी व संघर्षाला सामोरे जाण्याची ताकद देणारे प्रेरणास्थळ- गणेश कवडे

## नाना पाटील वस्ताद तालीमच्या वतीने मल्लांचा सत्कार

**अहमदनगर । रयत समाचार**

नालेगाव येथील नाना पाटील वस्ताद तालीम ही केवळ कुस्तीची तालीम नसून मल्लांना घडविणारी, शिस्त आणि मेहनतीचे संस्कार करणारी एक जीवनशाळा आहे. विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या मल्लांचा सत्कार करून आम्हाला आनंद होत आहे. स्पर्धेमध्ये यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांना जेव्हा समाजाकडून कौतुकाची दाद मिळते, तेव्हा त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते नक्कीच आपल्या ध्येयापर्यंत पोहोचतात. तालीम ही फक्त शरीरसौष्ठव देणारी जागा नसून जिद्द, चिकाटी आणि संघर्षाला सामोरे जाण्याची ताकद देणारे प्रेरणास्थळ आहे. आजच्या पिढीला मोबाईल व इंटरनेटच्या आहारी जाण्यापासून वाचवायचे असेल तर खेळाचे संस्कार आवश्यक आहेत. अशा वेळी कुस्ती हा खेळ मुलांना जमिनीवर राहण्याची जाणीव करून देतो. त्यामुळे गावोगावच्या तालिमी सक्रिय राहिल्या पाहिजेत, असे प्रतिपादन माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांनी केले. नालेगाव येथील नाना पाटील वस्ताद तालीमच्या वतीने विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेल्या



मल्लांचा सत्कार माजी स्थायी समिती सभापती गणेश कवडे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमात कुस्ती क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल पुरस्कारप्राप्त अनिल म्हस्के तसेच विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झालेले शौर्य मदने, तेजस डागवाले, योगीराज वामन, चिदंबर शिंदे, आर्य दातरंगे, रुद्र शिंदे यांचा तसेच कुराश स्पर्धेतील विजेता मल्हार सुरसे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी काका शेळके, पै. मनोहर शिंदे, रघुनाथ लांडे, बाळासाहेब भापकर, शिवाजी गुंजाळ, ऋषिकेश लांडे, राम कराळे, अश्विन दुरगुळे, शाम शिंदे, ईश्वर शेळके, राजू म्हस्के, राहुल कवडे, निलेश काळे, अरुण दाते, आकाश घोडके, सागर शिंदे, अमोल बनकर, मयुर जपे, किशोर देवकर आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी कवडे पुढे म्हणाले की, ''नाना पाटील वस्ताद तालीम ही अशाच प्रकारे कुस्तीच्या परंपरेला जोपासत आहे. खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळावे आणि त्यांची जिद्द कायम प्रज्वलित राहावी, या उद्देशाने हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सन्मानामुळे मुलांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होईल आणि भविष्यात ते राज्य व राष्ट्रीय स्तरावर नक्कीच यश मिळवतील. समाजातील प्रत्येक घटकाने या खेळाडूंना प्रोत्साहन दिले पाहिजे. आपल्या शहराचे, गावाचे व तालुक्याचे नाव उज्वल करण्यासाठी ही तरुणाई सक्षम आहे, याचा मला अभिमान वाटतो.'' सत्काराला उत्तर देताना खेळाडूंच्या वतीने अनिल म्हस्के म्हणाले की, ''आमच्या मेहनतीला आज सन्मान मिळाल्याने आमचा आत्मविश्वास वाढला आहे. तालीममधील गुरुजनांच्या मार्गदर्शनामुळे आणि पाठिंब्यामुळे आम्ही येथे पोहोचू शकलो. भविष्यात आणखी चांगले यश संपादन करून गाव, तालुका आणि जिल्ह्याचे नाव राज्यभर उज्वल करण्याचा आम्ही नक्कीच प्रयत्न करू.

## ५० टक्के व्याज माफ सवलत योजनेचा लाभ घ्या

**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाच्या थकीत कर्ज प्रकरणात थकीत कर्ज रक्कमेचा एकरकमी भरणा करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी ५० टक्के व्याज माफ सवलत योजनेचा लाभ घेता येणार आहे.

सदर एकरकमी परतावा योजना ३१ मार्च २०२६ पर्यंत राबविण्यात येणार असून, महामंडळाच्या थकबाकीदार लाभार्थ्यांनी या योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त होण्याचे जिल्हा व्यवस्थापक बी.एस. भोसले यांनी आवाहन केले आहे.

अधिक माहितीसाठी लाभार्थ्यांनी महामंडळाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयाशी ०२४१-२४५००३० या क्रमांकावर संपर्क साधावा, असेही सांगितले आहे.

## साई बुद्धिबळ करंडक स्पर्धेचे आयोजन

**अहमदनगर । रयत समाचार**

श्री साई इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या पंचवीसाव्या वर्षानिमित्त रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करण्याच्या उपक्रमांतर्गत बुद्धिबळ करंडक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १३ व १४ सप्टेंबर २०२५ रोजी गावडे मळा, एकविरा चौक, पाईपलाईन रोड, सावेडी येथील स्कूलच्या प्रांगणात पार पडणार आहे. आंतरशालेय जिल्हास्तरीय बुद्धिबळ क्रीडा स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर मनपा, अहिल्यानगर बुद्धिबळ असोसिएशन व श्री साई इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमानाने होणार आहे. बुद्धिबळ हा दोन खेळाडूंमध्ये खेळला जाणारा बौद्धिक खेळ असून तो खेळाडूंच्या एकाग्रता, निर्णय क्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता व आत्मविश्वास वाढीसाठी महत्त्वाचा ठरतो. ही स्पर्धा चौदा वर्ष, सतरा वर्ष व १९ वर्ष वयोगटात खेळवली जाणार असून प्रथम क्रमांकासाठी श्री साई करंडक व १००१ रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ट्रॉफी व ७०१ रुपये, तृतीय क्रमांकासाठी ट्रॉफी व ५०१ रुपये, चतुर्थ क्रमांकासाठी ट्रॉफी व ३०१ रुपये आणि पाचव्या क्रमांकासाठी ट्रॉफी व २०१ रुपये बक्षीस ठेवण्यात आले आहे. संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे व स्कूलचे क्रीडा शिक्षक प्रसाद पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी क्रीडा शिक्षक प्रसाद पाटोळे सर यांच्या ७५०७५६०५५६ या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

## आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान सहसंयोजकपदी आ. पाचपुते

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

विकसित भारत २०४७ चे स्वप्न साध्य करण्यासाठी आणि भारताला जागतिक पातळीवरील



आर्थिक महाशक्ती बनविण्याच्या ध्येयाने भारतीय जनता पार्टी २५ सप्टेंबर ते २५ डिसेंबर २०२५ या कालावधीत राज्यभर आत्मनिर्भर भारत संकल्प अभियान राबवणार आहे. या अभियानासाठी श्रीगोंदा - नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रम बबनराव पाचपुते यांना प्रदेश सहसंयोजकपदी नियुक्त करण्यात आले आहे. या नियुक्तीबाबत भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा, सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी आमदार पाचपुते यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या नियुक्तीबाबत समाधान व्यक्त करत पक्ष नेतृत्वाचे आभार मानले असून, ही नियुक्ती श्रीगोंदा व नगर मतदारसंघासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## तालुका वकील संघ अध्यक्षपदी आगळे तर उपाध्यक्षपदी शेख यांची निवड

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव तालुका बार असोसिएशनच्या वकील संघाची नवी कार्यकारिणी जाहीर झाली आहे. अध्यक्षपदी ॲड. रामदास रंगनाथ आगळे, उपाध्यक्षपदी ॲड. मुनाफ अल्ताफ शेख, सचिवपदी ॲड. सुहास झुंबरराव चव्हाण तर खजिनदारपदी ॲड. अजय अशोक मोहिते यांची निवड झाली. अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार पदांसाठी उमेदवार बिनविरोध निवडले गेले. उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. मुनाफ शेख यांनी ५३ मते मिळवून ॲड. लक्ष्मण रमेश बोरुडे (२६ मते) यांना २७ मतांनी पराभव दिला. तालुक्यातील ८६ सभासदांपैकी ८० सभासदांनी मतदान केले. निवडणूक शांत व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे वकील संघ सदस्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून तालुक्यातील वकील बांधव, पक्षकार व नागरिकांकडून सत्कार व अभिनंदन होत आहे.



# बचत गटांनी योजनांचा लाभ घेऊन विकास साधावा- बबनराव पाचपुते

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

शासनाने बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू केले आहे. या संदर्भात महिलांसाठी विविध योजना राबविल्या जात असून त्याद्वारे बचत गटांना आर्थिक उन्नतीसाठी सहाय्य मिळत आहे. त्यामुळे बचत गटांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचा तसेच समाजाचा विकास साधावा, असे प्रतिपादन माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी केले. ते महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), अहिल्यानगर अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या क्रांतीज्योत लोकसंचालित साधन केंद्राच्या १४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पाचपुते म्हणाले की, ''लाडकी बहिण योजनेमुळे शासन महिलांच्या घरोघरी पोहोचले आहे. देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेता घेता देणाऱ्याचे हात व्हावे या भावनेतून बचत गटांच्या महिलांनी एकमेकांना सहाय्य करून सक्षमीकरण साधावे.'' सभेच्या अध्यक्षस्थानी लिलावती शिंदे होत्या. व्यासपीठावर माविमचे विभागीय सल्लागार शैलेश पाटील, विभागीय उपजीविका सल्लागार नवनाथ नाईक, जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते, एमआयएस सल्लागार योगेश कदम, साधन केंद्राच्या व्यवस्थापक कांता सुपेकर, तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी, बँक ऑफ महाराष्ट्रचे संकेत बेल, आयसीआयसीआय बँकेचे अमोल गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. या सभेला केंद्राशी संलग्न २८ गावांतील



महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. जिल्हा समन्वय अधिकारी उमेश कहाते यांनी प्रास्ताविक करताना लोकसंचालित साधन केंद्राच्या स्थापनेचा व कार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, ''सन २०११ मध्ये स्थापन झालेल्या या केंद्राने बचत गटांच्या माध्यमातून महिलांचा सामाजिक व उद्योजकीय विकास साधला आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ महिलांपर्यंत पोहोचविण्यासोबत त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे कार्य या केंद्राद्वारे केले जात आहे.'' शैलेश पाटील व नवनाथ नाईक यांनी शासनाच्या विविध १० विभागांतील योजनांची माहिती दिली तसेच पात्रतेबाबत मार्गदर्शन केले. याचबरोबर महिलांनी अधिकाधिक प्रमाणात शासकीय योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. अध्यक्षीय भाषणात लिलावती शिंदे म्हणाल्या की, ''सध्या साधन केंद्राच्या माध्यमातून एकूण ५९७८ महिला सक्षमीकरणाच्या कार्यात सहभागी आहेत. भविष्यात हे केंद्र श्रीगोंदा तालुक्यात बचत गट चळवळीत अग्रेसर राहील, असा विश्वास आहे.'' यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बचत गटांचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आर्थिक अहवाल वाचन व्यवस्थापक कांता सुपेकर यांनी केले. सूत्रसंचालन उपजीविका विकास सल्लागार शुभांगी सुर्यवंशी यांनी केले, तर आभार प्रदर्शन वंदना भागवत यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रुपाली महाडीक, रोशन शेख, पल्लवी गोरखे, सुवर्णा क्षीरसागर, कविता सांगळे, निशा राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले.